हैं तय्यार हम...

मी धावणार माझ्यासाठी

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
21km
Associate Sponsor RiSO Ricebran Oil
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

दि. १७ डिसेंबर रोजी होणाऱ्या औरंगाबाद महामॅरेथॉनसाठी आम्ही सर्व सज्ज आहोत. हा अतिशय स्तुत्य उपक्रम असून, सर्व शहरवासीयांनी यात नक्कीच सहभाग नोंदवावा. तेव्हा औरंगाबादकरांनो लवकरात लवकर नावनोंदणी करा आणि महामॅरेथॉनसाठी 'हैं तय्यार हम...' असे ठणकावून सांगा.

-डॉ. चारुशिला देशमुख, डॉ, विकास देशमुख

नागपाल ग्रुप - (डावीकडून) पुष्पा काळे, ज्योती पवार, वैशाली कुमावत, राखी सिंधफळकर, विवेक सावडे, राजेश्वर पेड, नेहा पांडे, नीळकंठ नागपाल, गुलाब सोळुंके, जिगर शहा, गजानन जाधव, सचिन खरात, प्रशांत लेले.

एस. पी. ग्रुप - बलभीम गायकवाड, बालासाहेब दुधमल, सुभाष पुजारी, सखाराम कुडके, चंद्रशेखर कुलथे, ॲड. अंबादास कवरे, वसंत जाधव, कृष्णा ठोंबरे.

नारायणा आयआयटी ॲण्ड पीएमटी अकॅडमी - (डावीकडून) प्रशांत शुक्ला, देवीदयाल मुखुटी, विश्वजित मोहंती, डॉ. एम. एफ. मलिक, अब्दुल हनमन, झीशान अली अमन, धीरज कुमार रे, प्रदीप शुक्ला, दुर्गेश सिंग, राहुलकुमार चौधरी, डॉ. अलोक कुमार, डॉ. संजय सिंग, देवदत्त झा, गोधानसिंग जाडोईन, विशाल लदनिया.

ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

स्पर्धा
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

किराडपुऱ्यात रखडलेले रस्त्याचे काम सुरू करा

महापौरांचे आदेश : माजी नगरसेवक पटेल यांच्या पाठपुराव्याला अखेर आले यश

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : आझाद चौक ते राम मंदिरापर्यंत रस्त्याचे काम व्हावे यासाठी मागील अनेक वर्षांपासून माजी नगरसेवक इब्राहीम पटेल महापालिकेकडे पाठपुरावा करीत आहेत. त्यांच्या पाठपुराव्याला यशही आले. मनपा आयुक्त डी.एम. मुगळीकर यांनी रस्त्याचे कामही सुरु केले. आता काम अंतिम टप्प्यात पोहोचले असताना काही राजकीय मंडळींनी काम थांबवायला लावले. त्यामुळे शुक्रवारी सकाळी महापौर नंदकुमार घोडेले, सभागृहनेता विकास जैन यांनी रस्त्याची पाहणी केली. रस्त्याचे उर्वरित काम त्वरित सुरु करण्याचे आदेश महापौरांनी प्रशासनाला दिले.

किराडपुऱ्यातील रस्त्याचे काम रखडल्याने महापौर नंदकुमार घोडेले, सभागृहनेता विकास जैन यांनी पाहणी केली. सोबत माजी नगरसेवक इब्राहीम पटेल आदी.

किराडपुरा ते रोशनगेट हा रस्ता रुंद व्हावा, रस्ता गुळगुळीत व्हावा यासाठी मागील अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरु आहेत. अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर आता २ कोटी रुपये खर्च करुन मनपा रस्ता गुळगुळीत करीत आहे. रस्त्याच्या मध्यभागी आकर्षक पथदिवे, दुभाजकही लावण्यात येत आहेत. या भागात राहणाऱ्या हजारो नागरिकांना खराब रस्त्यामुळे मागील अनेक वर्षांपासून त्रास सहन करावा लागत होता. इब्राहीम पटेल यांनी अलीकडेच रस्त्याचे काम सुरु करावे या मागणीसाठी मनपासमोर उपोषणाचा इशारा दिला होता. मनपा आयुक्त डी. एम. मुगळीकर यांनी उपोषण करु नये अशी विनंती पटेल यांना करीत स्वत: या भागाची पाहणी केली. त्यानंतर लगेच सिमेंट रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. काम अंतिम टप्प्यात पोहोचले असताना काही राजकीय मंडळींनी त्यात विघ्न निर्माण करुन काम बंद पाडले. त्यामुळे शुक्रवारी सकाळी महापौर नंदकुमार घोडेले, सभागृहनेता विकास जैन यांनी रस्त्याची पाहणी केली. कार्यकारी अभियंता हेमंत कोल्हे यांना काम त्वरित सुरु करा, असे आदेशित केले. यावेळी इब्राहीम पटेल यांच्यासह किराडपुरा भागातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मालमत्ताधारकांची आज बैठक

किराडपुरा येथे रस्ता रुंदीकरणात पाच ते सहा मालमत्ताधारकांना महापालिकेने कोणताही मोबदला दिलेला नाही. शुक्रवारी या मालमत्ताधारकांनी महापौरांकडे रोख मोबदला द्यावा, अशी मागणी केली. यासंदर्भात शनिवारी दुपारी ४ वाजता मनपात एका बैठकीचे आयोजन केले आहे. त्यात मालमत्ताधारकांचा प्रश्न मार्गी लावण्यात येणार आहे.

जागतिक अपंग दिन विशेष : शाब्दिक आश्वासन पुरे, आता धोरण तयार करावे

याला अपंगांचा बैलपोळा म्हणावे काय?

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : गोवा, छत्तीसगड यासारख्या लहान-लहान राज्यांनीही अपंग व्यक्तींसाठी स्वतंत्र धोरण तयार केले आहे. मात्र, स्वत:ला पुरोगामी म्हणविणाऱ्या महाराष्ट्रात आजही अपंगांसाठी स्वतंत्र धोरण नसावे, हे दुर्दैव आहे. जागतिक अपंग दिन आला की अपंग लोकांचा कळवळा येणे, त्यांना गोडधोड खाऊ घालणे आणि वर्षभर त्यांच्या प्रश्नांकडे ढुंकूनही न पाहणे, असा प्रकार सध्या सुरु आहे. त्यामुळे हा जागतिक अपंग दिन नसून अपंगांचा बैलपोळा आहे की काय? असे वाटते, अशी प्रतिक्रिया देत जागतिक अपंग दिनाच्या निमित्ताने तीव्र नाराजी व्यक्त करून धोरणविषयक मागणी केली जात आहे.

गोड, गुलाबी शब्दांचा मुलामा नको

गुलाबी शब्दांचा मुलामा देऊन अपंगांचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी ठोस धोरण असणे आवश्यक आहे. प्रत्येक अपंगाच्या अडचणी आणि प्रश्न वेगवेगळे आहेत. अपंगांचे शारीरिक, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक पुनर्वसन होण्यासाठी धोरणाची नितांत आवश्यकता आहे. आज जागतिक अपंगदिनी हे धोरण जाहीर होणे अपेक्षित होते. मात्र, पुन्हा एकदा पदरी निराशाच पडली आहे. खरोखरच अपंग लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणायचे असेल, तर धोरण जाहीर होणे गरजेचे आहे.

- सुहास तेंडुलकर

३ डिसेंबर हा दिवस जागतिक अपंग दिन म्हणून साजरा केला जातो. अपंग या सदरात मतिमंद, गतिमंद, मूकबधिर, अंध, शारीरिक व्यंग असणाऱ्या सर्वच व्यक्तींचा समावेश होतो. आज भारतात १५ ते १६ राज्यांमध्ये अपंगांसाठी स्वतंत्र धोरण आहे. या धर्तीवर महाराष्ट्रातही असे धोरण तयार करावे, अशी येथील अपंगांची अपेक्षा आणि गरज आहे. यासाठी अपंग कल्याण आयुक्तालय, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, महाराष्ट्रातील अपंग कार्यकर्ते, या विषयाशी संबंधित असणाऱ्या विविध शासकीय कार्यालयांतील प्रतिनिधी अशा सर्वांनी मिळून या धोरणाविषयीचा मसुदा तयार करून ४- ५ वर्षांपूर्वीच शासनाकडे पाठविला होता.

अपंगत्व येऊ नये इथपासून ते अपंगत्व आल्यापर्यंतचे सर्व काही या मसुद्यात समाविष्ट केलेले आहे. आज महाराष्ट्रात अपंगांचे प्रमाण मोठे आहे; पण त्यांना गांभीर्याने घेतले जात नाही. अर्ज- विनंत्या आणि आंदोलनांच्या माध्यमातून धोरण जाहीर व्हावे म्हणून वारंवार पाठपुरावाही करण्यात येत आहे. मात्र, अजूनही शासन या बाबतीत थंडच असून, आश्वासनांपेक्षा जास्त पदरात काहीही पडत नाही, अशी तीव्र नाराजी यानिमित्ताने अनेकांनी व्यक्त केली.

'लोकमत ग्रुपचा मॅरेथॉनचा उपक्रम अतिशय स्तुत्य'

लोकमत न्यूज नेटवर्क

यशस्वी यादव
पोलीस आयुक्त

औरंगाबाद : लोकमत ग्रुपतर्फे १७ डिसेंबर रोजी आयोजित हाफ मॅरेथॉन हा अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये शारीरिक फिटनेसबद्दल जनजागृती निर्माण होईल, असा विश्वास शहराचे पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांनी व्यक्त केला.

लोकमत ग्रुपच्या वतीने १७ डिसेंबर रोजी शहरात हाफ मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. या मॅरेथॉनचे हे दुसरे वर्ष आहे. गतवर्षी झालेल्या मॅरेथॉनमध्ये शहरवासीयांसोबत पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला होता. या पार्श्वभूमीवर बोलताना पोलीस आयुक्त म्हणाले की, लोकमत ग्रुपने आयोजित केलेल्या हाफ मॅरेथॉनचा उपक्रम प्रत्येकाच्या शारीरिक फिटनेससाठी अत्यंत महत्त्वाचा आणि स्तुत्य आहे. मॅरेथॉनमुळे शहरवासीयांमध्ये सुदृढ आरोग्याबाबत जनजागृती निर्माण होण्यास मदत होईल. यामुळे जास्तीत जास्त लोक सुदृढ आणि शारीरिक दृष्ट्या फिट होतील. एक दिवसाची मॅरेथॉन न समजता नागरिकांनी रोज धावावे, व्यायाम केला पाहिजे. याशिवाय नागरिकांनी व्यायामासोबतच सकस आहाराकडेही लक्ष दिले पाहिजे. गतवर्षीप्रमाणे यावर्षीही शहर पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी मॅरेथॉनमध्ये धावणार आहेत. आपणही आपल्या वेळेनुसार सहभाग घेण्यासंदर्भात निर्णय घेणार आहे. या मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी नागरिकांनी आजपासूनच रोज आपल्या शारीरिक क्षमतेनुसार सराव करावा.

५० टक्के प्राध्यापकांची 'बायोमेट्रिक' नोंदणी नाही

मस्टरवरच हजेरी : बायोमेट्रिकचाच होणार विचार

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : देशभरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या (एमसीआय) रडारवर आले आहेत. १ डिसेंबरपासून मूल्यांकन प्रक्रियेत केवळ बायोमेट्रिक प्रणालीवरील उपस्थितीचाच विचार केला जाणार आहे; परंतु अद्यापही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) ५० टक्के प्राध्यापकांची बायोमेट्रिकवर नोंदणीच झालेली नसल्याचे समजते.

'एमसीआय'ने डिजिटल मिशन मोड प्रकल्पांतर्गत सर्व वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक आणि शिक्षकांची ऑनलाइन उपस्थिती घेण्याचा निर्णय घेतला आहे. 'एमसीआय'च्या ३१ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीत या प्रकल्पाचा प्रारंभ करण्यात आला आहे. घाटीमध्ये महाविद्यालय, रुग्णालय, मेडिसीन विभाग आदी ठिकाणी एकूण २० बायोमेट्रिक उपकरणे लावण्यात आली आहेत. यातील १४ उपकरणे कार्यान्वित आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या आस्थापनेत २९ प्राध्यापक, ९९ सहयोगी प्राध्यापक आणि १४२ सहायक प्राध्यापक आहेत; परंतु केवळ ५० टक्के प्राध्यापकांचीच नोंदणी झाल्याचे समजते. चार महिन्यांपासून नोंदणीच ठप्प झाली आहे. या प्रक्रियेला गती मिळण्यासाठी अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर यांनी नोडल अधिकारी म्हणून सहयोगी प्राध्यापक डॉ. मिर्झा सिराज बेग यांची नियुक्ती केली आहे.

पाठपुरावा सुरु

- महाविद्यालय स्तरावर संपूर्ण प्रक्रिया झालेली आहे. संबंधित एजन्सीकडून नोंदणी होणे बाकी आहे. यासाठी पाठपुरावा सुरु आहे. ५० टक्के प्राध्यापक, सहयोगी, सहायक प्राध्यापकांची नोंदणी राहिल्यासंदर्भात 'एमसीआय'लाही कळविण्यात आले आहे. लवकरच ती पूर्ण होईल, अशी माहिती डॉ. मिर्झा सिराज बेग यांनी दिली.

इंदिरानगर येथील मनपाच्या याच प्रियदर्शिनी शाळेचा प्रस्ताव आंतरराष्ट्रीय शाळेसाठी शासनाकडे दाखल करण्यात आला आहे.

मनपा शाळेची 'आंतरराष्ट्रीय' वाटचाल

मंगळवारी पाहणी : प्रियदर्शिनी शाळेचा प्रस्ताव

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र विद्या प्राधिकरणातर्फे राज्यातील शंभर शाळा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या करण्यात येणार आहेत. औरंगाबाद जिल्ह्यातील फक्त चार शाळांचा यात समावेश असून, औरंगाबाद महापालिकेच्या एकमेव प्रियदर्शिनी हायस्कूलचा समावेश आहे. या शाळेला आंतरराष्ट्रीय दर्जा देण्यात येऊ शकतो का याची पाहणी करण्यासाठी राज्य शासनाचे एक पथक मंगळवारी शाळेत दाखल होणार आहे.

महाराष्ट्र विद्या प्राधिकरणाने १० ते २५ ऑक्टोबर या काळात राज्यातील महापालिका, जिल्हा परिषदेच्या शाळांना आपले प्रस्ताव दाखल करण्याचे आवाहन केले होते. औरंगाबाद महापालिकेतील एकमेव प्रस्ताव दाखल झाला. जिल्ह्यातील तीन जि.प. शाळांनीही या योजनेत सहभाग नोंदविला आहे. सोमवारी वेगवेगळ्या पडताळणी पथकाद्वारे जिल्ह्यातील चारही शाळांची तपासणी करण्यात येणार आहे. शासन योजनेनुसार राज्यातील दहा शाळा 'ओजस' आंतरराष्ट्रीय शाळा म्हणून ओळखल्या जातील. ९० शाळा 'तेजस'आंतरराष्ट्रीय शाळा राहणार आहेत. या उपक्रमासाठी निवड प्रक्रिया अत्यंत अवघड स्वरूपाची आहे. शाळेतील विद्यार्थी संख्या, तुकड्या, पटपडताळणी, विद्यार्थ्यांना कोणकोणत्या सोयी आतापर्यंत प्रदान केलेल्या आहेत. याची अत्यंत बारकाईने पाहणी करण्यात येणार आहे. ज्या शाळांनी योजनेत सहभागी होण्यासाठी प्रस्ताव दाखल केले आहेत, ते भविष्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी-सुविधा पेलवू शकतात का? शाळेतील विद्यार्थी, शिक्षकांची क्षमता किती आहे, यावर गोष्टींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

आमची तयारी पूर्ण

मंगळवारी प्रियदर्शिनी शाळेची पाहणी करण्यासाठी एक पथक येणार आहे. आम्ही याच्या तयारीसाठी लागलो आहोत. शाळेतील भौतिक सोयी-सुविधांचा समिती अभ्यास करणार आहे. त्यांच्या अहवालानंतर शाळेची आंतरराष्ट्रीय शाळा म्हणून निवड होऊ शकते. शासनाने ठरवून दिलेल्या निकषात मनपा शाळा कुठेही कमी पडू नये यादृष्टीने मागील काही दिवसांपासून तयारीही सुरू आहे, अशी माहिती महापालिकेचे शिक्षणाधिकारी श्रीकांत कुलकर्णी यांनी सांगितले.